**साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास विधिज्ञ श्री.एस.बी.पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरू ःः-**

तोंडार हे माझे मुळ गाव आहे. शेती माझा प्रमुख व्यवसाय आहे. माझे ऋषिकेश ऑटोमोबईलचे दुकान होते. मी माझे दुकान उमा चौकात होते. मी २०२१ साली तो व्यवसाय बंद केला. त्यामध्ये मी मोटार सायकल व मोठ्या वाहनाचे स्फेअर पार्ट विक्री ठेवायचो. व्यवसायानिमित्त उदगीर बँक व हैद्राबाद बँकेत सी.सी अकाउंट काढले होते. माझ्या दोन बँकेतील सी.सी. अकाउंट दोन लाख पर्यंतचे होते. मला व्यवसायामध्ये तोटा झाल्यामुळे तो व्यवसाय बंद केला. संगम हा मुळचा गंगापूर येथील होय. संगम यांचे ममता मोबाईल शॉपी व रिपेअरींग सेंटर होते. २०१५ सालापासून त्यांचा तो व्यवसाय चालू होता.

संगम हा माझा जवळचा नातगल आहे असे म्हटले आहे कारण माझी बहीण व त्यांची बहीण एकाच घरात दिल्या आहेत. त्या सख्या जावा आहेत. संगमेश्वर यांच्या कडे कोणतीही चार चाकी विक्री करण्याचा परवाना नाही तो कोणत्या गाडीचा अधिकृत विक्रेता नाही. जुण्या गाडया खेरदीविक्री करण्याचा पण परवाना त्यांच्याकडे नाही. ममता मोबाईल जागेमध्ये पाठीमागे माधव बिरादार मावंदीकर यांचा फायनान्सचा व्यवसाय होता की काय ते मला माहिती नाही. प्रभाकर तपशाळे हा माझ्या आत्याचा मुलगा होय. संगमने मला घरी विकास नगर येथे स्विफ्ट गाडी आणून दाखविली. त्या मारुती गाडीचा मालक कोण होता ते मला माहिती नाही. त्यांने मला दोन तीन वेळा गाडी दाखविली. त्यांने विनंती केल्यामुळे ती गाडी विकत घेतली. मी त्या पोटी साडे तीन लाख रुपये माझ्या घरात असलेले रोख दिले. मी गाडीच्या कागदपत्राविषयी व गाडीच्या नोंदणी विषयी विचारणा केली नाही तसेच मालक कोण आहे त्यांची पण विचारणा केली नाही.

संगम हा जवळचा नातेवाईक असल्यामुळे गाडीचा करार करुन घेतला नाही. मी त्यामुळे त्यांच्याकडून पैसे दिलेघेतल्याची पावती करुन घेतली नाही किंवा वाहनाच्या नोंदणी विषयी कागदोपत्री पुर्तता करुन घेतली नाही. त्यानंतर तो संध्याकाळी गाडी व कागदपत्रे आणून देतो म्हणून गेला नंतर तो आला नाही. संगम

यांने मला तीन वेळा गाडी दाखविली यांचा उल्लेख फिर्यादीत किंवा शपथपत्रात केला नाही. ज्यावेळी त्यांने माझ्याकडून पैसे घेतले त्यावेळी ती गाडी तो घेवून आला नव्हता. त्यांच्याकडे दुस-या मित्राची गाडी होती त्यामुळे संध्याकाळी गाडी घेवून येतो म्हणून निघून गेला. त्या संध्याकाळी तो गाडी घेवून आला नसल्यामुळे मी त्याला फोन वरुन फोन केले असता त्यांने माझा फोन घेण्यास टाळाटाळ केली तर मी दुस-या दिवशी विचारणा केली असता तो मला म्हणला कि, मी घरच्या अडचणीमुळे मी पैसे खर्च केले आहे. गाडी काय मिळणार नाही थोडया थोडयांनी पैसे देवू. ०५.०८.२०१९ ला त्याला पैसे दिले होते दुस-या दिवशी ०६.०८.२०१९ ला त्यांच्याकडे गेलो होतो.

मी आरोपीकडे दोन वर्ष पैसे मागत राहिलो, त्यानंतर त्यांने मला दि.०९.०७.२०२१ चा चेक दिला. ०६.०८.२०१९ पासुन दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पैसे किंवा गाडी न दिल्याने मला फसवल्या सारखे वाटले. ०६.०८.२०१९ पासून पैसे मागण्यासाठी मी आरोपी नोटीस दिली नव्हती. दोन वर्षा कालावधी मध्ये पैसे मिळावे म्हणून लोकांसोबत बैठक घेतली नाही. मार्च – २०२० पासून लॉकडाउनचे आदेश आमंलात होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा संबंधातील असल्यामुळे मी त्यांच्या दुकानात बसलो असल्याने चेक चोरला व केस रचना केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आरोपीला साडे तीन लाख रुपये देण्याची ऐपत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी विरुध्द खोटी केस केलेली आहे. साडे तीन लाख रुपये दिल्याची कोणत्याही नोंद नोंदवहीमध्ये घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला संगम यांच्याकडून साडे तीन लाख येणे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, संगम यांच्या परिचयाचा फायदा घेवून केसची रचना केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस केली आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.10.08 18:15:32 +0530

दिनांकः- ०७.१०.२०२५

न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर